(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक:- २३७१/२०१९/अहमदनगर**

१ ॲड. श्रीकांत दिलीप मंडोरे : अपिलार्थी
रा. गाळा नं. ६, मार्केट यार्ड, शेवगांव,
ता. शेवगांव, जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),
पंचायत समिती कार्यालय, शेवगांव,
ता. शेवगांव, जि. अहमदनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, शेवगांव,
ता. शेवगांव, जि. अहमदनगर.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक १०/०८/२०२१**

अपिलार्थी यांनी दिनांक ०५/०९/२०१९ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक १०/०८/२०२१ रोजी ऑनलाईन meet.google.com/uox-dehn-ors या गुगल मिट कोडद्वारे आयोजित सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ३०/०५/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी मुळ अर्जामध्ये नमुद माहिती पुरविली नाही. चुकिची व अपुर्ण माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ३०/०५/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/०४/२००७ ते दिनांक ३१/०३/२०१९ या कालावधीतील "क" वर्ग देवस्थान आणि "ब" वर्ग देवस्थान शेवगांव तालुक्यामध्ये असणाऱ्या सर्व देवस्थान

यांची यादी, मंजुरी क्रमांक, मंजुरी वर्ष आणि त्याबाबत कार्यवाहीबाबतची नस्ती यांची साक्षांकित प्रत देणेत यावी, याबाबत माहिती माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध माहितीचे एकूण पाने १८१ इतके असुन प्रति पान दोन रुपये याप्रमाणे ३६२/- रुपये अधिक रजिस्टर पोस्टेजचा खर्च ५०/- रुपये शासकिय कोषागारात जमा करुन शुल्क जमा केलेची पावती या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने सादर करावी त्यानुसार आपणान माहिती पुरविणे सोईचे होईल, असे कळविले. त्यानुसार अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या माहिती शुल्का पैकी १८०/- रुपये इतका माहिती शुल्काचा भरणा केला असल्याने दिनांक १९/०८/२०१९ रोजी उपलब्ध व देय असलेली माहिती प्रत्यक्ष मागणी केले प्रमाणे समक्ष देण्यात आली. त्यादरम्यान अपिलार्थी यांनी दिनांक १५/०७/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १५/०७/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३/०८/२०१९ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती सात दिवसाचे आत विनामुल्य पुरविण्याबाबतचे निर्देश तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देण्यात येऊन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०/०८/२०१९ रोजी माहिती पुरविली अपिलार्थीस सदर माहिती समक्ष देण्यात आली त्याबाबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या प्रतीवर माहिती मिळाल्याबाबत स्वाक्षरीची पोहोच दप्तरी दाखल करण्यात आली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ३०/०५/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस कार्यालयातील उपलब्ध माहिती तसेच वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती पुरविल्याची पोच आयोगास केली आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. मात्र सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी नमुद केले की, अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाली असल्याने त्यांचे समाधान झालेले नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक व वेळ निश्चित करुन अर्जान्वये मागणी केलेली माहिती अवलोकनाची संधी देवून पुरविणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०/०५/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन माहिती विनामूल्य पुरवावी.

२) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक २३७१/२०१९/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(के. एल. बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**